क्रमांक [illegible] क-१.
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.
दिनांक: २९ ऑक्टोबर, २०२६.

संदर्भ :- (१) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.सीएफआर-१२११/प्र.क्र.२५७/तेरा,
दिनांक ७ फेब्रुवारी, २०१८.
(२) सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.संकीर्ण -२०२५/प्र.क्र.२७/मआस्था/
दि.२० जून,२०२५

:: परिपत्रक ::

या सचिवालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना कळविण्यात येते की, संदर्भाधिन शासन निर्णय व परिपत्रकान्वये गट-अ व गट-ब (राजपत्रित) या संवर्गातील सर्व अधिकारी यांचे कार्यमूल्यमापन अहवाल स्वयंमूल्यनिर्धारण, प्रतिवेदन, पुनर्विलोकन करुन "महापार" या संगणक प्रणालीमध्ये नोंदविण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

त्याच धर्तीवर या सचिवालयात देखील "महापार" संगणक प्रणाली कार्यान्वित करण्याकरीता मा.मंडळाने दिलेल्या मान्यतेनुसार या सचिवालयातील गट-अ व गट-ब (राजपत्रित) अधिकारी यांचे सन २०२६-२०२७ (दि.१ एप्रिल, २०२६ ते ३१ मार्च, २०२७) या कालावधीतील कार्यमूल्यमापन अहवाल विहित कालावधीत पूर्ण होण्याच्या दृष्टीने "महापार" या संगणक प्रणालीमध्ये नोंदविण्यात येणार आहेत.

त्यानुषंगाने या सचिवालयातील गट-अ व गट-ब (राजपत्रित) या संवर्गातील अधिकारी यांचे कार्यमूल्यमापन अहवाल "महापार" या संगणक प्रणालीमध्ये नोंदविणेकरिता करावयाच्या कार्यवाही संदर्भातील प्रशिक्षण गुरुवार, दिनांक २२ ऑक्टोबर, २०२६ रोजी दुपारी ३.०० ते सायंकाळी ६.०० वाजता, या वेळेत मध्यवर्ती सभागृह, पाचवा मजला, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आले आहे. सदरहू प्रशिक्षणास गट-अ व गट-ब (राजपत्रित) या संवर्गातील सर्व अधिकारी यांनी उपस्थित रहावे.

आदेशानुसार,

(मोहन काकड)
उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

प्रति,

१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे कार्यालय.

२) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे कार्यालय.

२/-

३) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे कार्यालय,

४) मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे कार्यालय,

५) सचिव - १ महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय,

६) सचिव - २ महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय,

७) सचिव - ३ महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय,

८) सचिव - ४ महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय,

९) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी.

१०) क-२ संगणक कक्ष.

११) ग-२ सामान्य कक्ष.